ESTD 1962
"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

संदर्भ: वित्त मंत्रालय, भारत सरकार, दिल्ली यांचे परिपत्रक कमांक 04/2022F.No.275/192/2020-IT (B) दि. 15 मार्च, 2022.

शिवाजी विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, आयकर नियम 1961 मधील कलम 192 नुसार आयकर कपातीच्या दृष्टिकोनातून, विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवक यांनी सन 2022-23 या आर्थिक वर्षामधील आपले उत्पन्न व आयकर सवलत मिळणेसाठी गुंतवणूक करणेत आलेली रक्कम या संदर्भातील तपशीलवार माहिती देवून करपात्र उत्पन्न व भरावा लागणारा आयकर/अधिभार याचे स्वनिर्धारण करून त्या बाबतची माहिती Google Link द्वारे सादर करणेबाबत यापूर्वी संदर्भ कमांक शिवाजी विद्या/पगारपत्रके/डि.वाय/आयकर 2022-23/49 दिनांक 21 एप्रिल 2022 रोजीच्या परिपत्रकांन्वये कळविण्यात आले होते.

त्यानुसार विद्यापीठातील सर्व शिक्षक/प्रशासकीय सेवक यांना कळविण्यात येते की, सध्या ज्या शिक्षक/प्रशासकीय सेवक यांनी आयकर गणना करणेसाठी विहीत नमुन्यामध्ये माहिती पगार पत्रके विभागास सादर केलेली आहे, ती माहिती संगणकीय वेतनप्रणालीत घेतली असून त्यानुसार आयकर कपात होत आहे. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Employee Corner येथे Additional Earning & Investment येथे ज्या त्या शिक्षक/प्रशासकीय सेवक यांना त्यांचे वैयक्तिक लॉग इन वर बघता येत असून त्यामध्ये काही दुरूस्ती असल्यास किंवा त्याव्यक्तिरिक्त काही नविन नोंदी घ्यावयाच्या असल्यास **दिनांक 17 डिसेंबर, 2022 पर्यंत Google Link द्वारे सादर करावी.** अन्यथा आयकर कमी पडणारी रक्कम आपल्या फेब्रुवारी 2022 च्या वेतनातून कपात केली जाईल व कपात केलेली रक्कम आयकर नियमानुसार शासनास भरणा केली जाईल तसेच सदरची रक्कम कमी जास्त झाल्यास संबंधित शिक्षक/प्रशासकीय अधिकारी व सेवक यांची वैयक्तीक जबाबदारी राहील याची कृपया नोंद घ्यावी.

**सदरची माहिती ऑनलाईन पद्धतीने Google Link द्वारे भरून देणेची असून त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे:-**

1. यापूर्वी 2022-23 ची माहिती सादर केली असल्यास पुन्हा सदरची माहिती भरू नये किंबहूना याबाबत Employee Corner येथे खात्री करून घ्यावी.
2. सदरचा अर्ज https://forms.gle/nC47RbLBZ7XW6omQ9 या गुगल लिंक द्वारे भरण्यात यावेत.
3. अर्ज भरताना विद्यापीठाकडून सर्व अधिविभाग/प्रशासकीय विभाग यांना अधिकृत दिलेल्या unishivaji.ac.in यावरूनच्या ई-मेल वरूनच सदरचा अर्ज भरता येईल. शिक्षक व प्रशासकीय अधिकारी यांना विद्यापीठाकडून अधिकृत unishivaji.ac.in या वेब वरून स्वतंत्र ई-मेल देण्यात आले आहेत त्यांनी त्याच ई-मेल वरून उपरोक्त नमुद गुगल लिंक ओपन करून त्यामध्ये माहिती सादर करावी. व अन्य सेवकांनी त्यांची माहिती विभागाच्या ई मेल वरून उपरोक्त नमुद गुगल लिंक ओपन करून त्यामध्ये माहिती सादर करावी.
4. अर्ज भरतेवेळी संबंधितांना आपले नांव, Employee Code याबाबत खात्री करावी तसेच गुंतवणूक केलेली रक्कम योग्य त्याच शिर्षकामध्ये नमुद करावी.
5. शिवाजी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर यांची पतसंस्था याद्वारे घेण्यात आलेले कर्जाच्या रक्कमेपैकी फक्त व्याजाच्या रक्कमेचा तपशीलाची नोंद करावी तसेच पतसंस्थेने नमुद केलेली मुद्दलाची रक्कम (Principal Amt.) सदर अर्जामध्ये नमुद करू नये.
6. ऑनलाईन फॉर्म भरतेवेळी सोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून ती **Attach** करावीत.
7. अर्जामध्ये नमुद केलेली माहीती बरोबर आहे याची खात्री करूनच अर्जाच्या शेवटी दिलेल्या अटिच्या कॉलममध्ये क्लिक करून तद्नंतर **Submit** चे बटनाद्वारे अर्ज सादर करावा.
8. अर्ज सादर केलेनंतर त्याची कॉपी आपल्याकडे जतन करून ठेवावी.
9. ज्या सेवकांचे एल.आय.सी. चे हप्ते वेतनातून कपात होतात, ती रक्कम अर्जामध्ये नमुद करण्यात येवू नये.

उपरोक्तनुसार विद्यापीठातील सर्व शिक्षक/प्रशासकीय सेवक यांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे आवश्यक माहिती विहित मुदतीत Online पध्दतीने सादर करावी.

शिवाजीविद्या./पगारपत्रके/डि.वाय/आयकर/ डिसेंबर 2022-23/272 / 142

प्र. वित्त व लेखाधिकारी

दिनांक- 07 डिसेंबर 2022

सोबत : वरील प्रमाणे.

टिप : 1. सर्व अधिविभागप्रमुख तसेच सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्वांच्या निदर्शनास आणावे.

2. वर्ग 04 च्या किंवा ज्यांना सदरचा अर्ज भरण्यासाठी अडचण येत असेल अशा सेवकांचे अर्ज संबंधित विभागामध्ये भरून घेण्याबाबत एकमेकांचे सहकार्य अपेक्षित आहे.

Scanned with OKEN Scanner